## प्रेस नोट

दिनांक १२.०७.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री. विशाल बाबाराव धोटे, वय ४५ वर्ष पद दृ मंडळ अधिकारी, नेमणुक , नांदगांव पेठ मंडळ, तहसिल कार्यालय, अमरावती रा. गणेश कॉलनि, अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दि. १२.०७.२०२३ चे 16.26 वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | २०,०००/—रुपये |
| ५ | स्विकारलेली रक्कम | १०,०००/—रुपये |
| ६ | घटनास्थळ | नांदगांवपेठ मंडळ, तहसिल कार्यालय, अमरावती ता.जि. अमरावती |

यातील तक्रारदार यांनी त्यांचे मुलाचे नावावार असलेले सिटीलॅंड येथील दुकान श्री. देवाणी यांना विक्री केले होते. परंतु सदर विक्री व्यवहारात तक्रारदार व श्री. देवाणी यांच्यात वाद झाल्याने विक्री केलेल्या दुकानाची फेरफार नोंद होऊ नये यासाठी लेखी आक्षेप अर्ज घेऊन तक्रारदार नांदगाव मंडळ, तहसील कार्यालय, अमरावती येथील मंडळ अधिकारी श्री. विशाल धोटे यांच्याकडे दि १२.०७.२०२३ रोजी गेले असता, मंडळ अधिकारी श्री धोटे यांनी श्री. देवाणी यांचा फेरफार अर्ज आल्यास त्याची फेरफार नोंद न घेण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांना २००००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे लेखी तक्रार दि १२.०७.२०२३ रोजी केली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.१२.०७.२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तडजोडीअंती आलोसे विशाल धोटे यांनी तक्रारदार यांच्याकडुन पंचासमक्ष २००००/— रुपये लाच मागणी करुन लाच स्वकारण्याची तयारी दर्शविल्याने आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री.धोटे यांनी पंचासमक्ष १००००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना लाच रकमेसह ताब्यात घेण्यात आले असुन, त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलिस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री शिवलाल भगत, पोलीस उपअधीक्षक, अमरावती घटक, अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि सतिश उमरे, पोनि केतन मांजरे, पोशि— शैलेश कडु, पोशि — आशिष जांभोळे, पोना — नितेश राठोड ला.प्र.वि. अमरावती यांनी पार पाडली.

नागरीकांना अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क — लाच लुचपत प्रतिबंधक विभाग ललित सेंटर, परांजपे कॉलनि, अमरावती**
**ऑफिस फोन नं. :— ०७२१— २५५२३५५, २६६४९०२**
**टोल फ्रि क्रं. :— १०६४**

(सतिश उमरे)
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंध विभाग, अमरावती

पोलीस उप अधिक्षक ॲन्टीकरप्शन ब्युरो, अमरावती
सत्यमेव जयते